
पांढरा कावळा

खूप खूप वर्षांपूर्वी, कावळे पांढरे असत, अगदी बगळ्यांसारखे पांढरे शुभ्र!






त्या काळात, रंगार्याचे
काम घुबड करत असे.

कावळ्याला वाटे, आपले
पंख निळे हवेत!

तो घुबडाकडे गेला. घुबडाने एका डब्यात थोडा निळा रंग तयार केला. कावळ्याला दुसऱ्या डब्यावर उभे केले, आणि त्याचे पंख निळे रंगवू लागला.



तेवढ्यात कावळ्याचा पाय घसरला आणि तो त्या डब्यात पडला.



जेव्हा कावळा बाहेर आला,
तेव्हा कोळश्यासारखा काळा
झाला होता!




कावळा चिडला, आणि घुबडाला चोच मारायला सरसावला. घुबड पटकन उडून गेले.

तेव्हापासून सगळे कावळे काळे झाले. अजूनही कावळे घुबडांवर राग धरून आहेत. त्यामुळे घुबडे दिवस उडत नाहीत, फक्त रात्री घरट्यातून बाहेर येतात, कारण काळोखात कावळ्यांना दिसत नाही!



मराठी अनुवाद - मानसी महाजन



A Bagful of Stories

Published by

Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

कुरूप चेहरा



एक दिवस मुल्ला त्यांच्या मित्राबरोबर रस्त्यावरून चालले होते. त्यांना रस्त्यावर एक चमकणारी वस्तू दिसली.

मुल्लांनी खाली वाकून ती वस्तू उचलली. तो होता एक आरसा.

परंतु उचलल्याबरोब्बर त्यांनी तो लगेच फेकून दिला.


"किती कुरूप चित्र आहे! कोणीतरी टाकून दिले असणार. एवढी कुरूप गोष्ट कोणाला हवीशी वाटेल?" ते म्हणाले.

पत्र

एक दिवस मुल्ला नसीरुद्दीनकडे एक माणूस वाचून घेण्यासाठी पत्र घेऊन आला.

मुल्लांनी काही वेळ ते पत्र पहिले.


"ही भाषा मला समजत नाही." ते म्हणाले.



"स्वतःला ज्ञानी विद्वान म्हणवता, डोक्यावर पगडी घालता, आणि साधे पत्र वाचता येत नाही?" तो माणूस वैतागून म्हणाला.

"बरं, हे घे! माझी पगडी घे, आणि आता तूच वाच तुझे पत्र," मुल्ला म्हणाले.

मराठी अनुवाद - मानसी महाजन



मनी माऊ



मनी माऊ, मनी माऊ
कुठे जाऊन आलीस?

राजवाड्यातल्या राणीला
पाहून मी आले.

मनी माऊ, मनी माऊ
काय मजा केलीस?

खुर्चीखालच्या उंदराला
घाबरवून आले!



पतंग, पतंग

वर वर वर उडतो पतंग
आकाशावर जातो पतंग
लाल, हिरवे रंगीत पतंग
मला तर भारी आवडे पतंग.



मराठी अनुवाद - मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

निळा कोल्हा

एक कोल्हा होता. त्याने अन्नाच्या शोधात अख्खे जंगले पालथे घातले, पण त्याला काहीच खायला मिळाले नाही.

तो जंगलाजवळच्या गावात गेला.





गावात एका मोठ्या पिपात कपडे
रंगवण्यासाठी नीळ भरून ठेवली होती.

कोल्हा चुकून त्या पिपात पडला.
डोक्यापासून पायापर्यंत निळा रंगला!

कोल्हा धावत धावत जंगलात आला. जंगलातल्या प्राण्यांनी निळ्या कोल्ह्याला पहिले. या नवीन प्राण्याची त्यांना भीती वाटली. वाघ सुद्धा या नवीन प्राण्याला घाबरला!

निळ्या कोल्ह्याने प्राण्यांना जवळ बोलावले.




"हे पहा! मी एक दिव्य प्राणी आहे! तुम्ही मी सांगतो ते सगळे तुम्ही ऐकले पाहिजे. आज पासून मी तुमचा राजा!" तो म्हणाला. सर्व प्राण्यांनी हे मान्य केले.

काही दिवसांनी पौर्णिमा आली. पूर्ण चंद्र पाहून कोल्ह्यांनी कोल्हेकुई सुरु केली. निळ्या कोल्ह्यानेसुद्धा त्यांच्या सुरत सूर मिसळला.

त्याची कोल्हेकुई ऐकून प्राण्यांना समजले, हा तर साधा कोल्हा आहे! सर्वांनी मिळून त्याला हाकलून लावले.

मराठी - मानसी महाजन



A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

सोन्याचे अंडे देणारे बदक

कोणे एके काळी, एका खेड्यात एक म्हातारा-म्हातारी राहत होते.
यांच्याकडे एक बदक होते.



हे बदक रोज एक सोन्याचे अंडे देई!

एक दिवस त्यांच्या मनात विचार आला. "हे बदक रोज एक सोन्याचे अंडे देऊ शकते, तर त्याच्या पोटात किती सोन्याची अंडी असतील!"

त्यांना वाटले, या बेडकाचे पोट फाडले, तर त्यातील सगळीच सोन्याची अंडी आपल्याला मिळतील!

त्यांनी लगेच सुरी घेऊन बदकाचे पोट फाडले.





परंतु पोटामध्ये एकही अंडे नव्हते. सामान्य बदकांप्रमाणेच त्याचे शरीर हाडा-मांसाचे बनलेले होते.

सोन्याचे अंडे देणाऱ्या बदकाला मारल्याबद्दल म्हातारा-म्हातारीला खूप पश्चात्ताप झाला.

एक दोन ....






एक दोन एक दोन
दारापाशी आले कोण?

तीन चार तीन चार
धावून धावून दमले फार!





पाच सहा पाच सहा
काठ्या गोळा केल्या पहा.



सात आठ सात आठ
पाढे माझे झाले पाठ

नऊ दहा नऊ दहा
आता पुरे! आणा चहा!

सहा छोटी बदके

मला ठाऊक आहेत सहा बदके छोटी,
काही मोठी काही ठेंगणी आणि काही बुटकी.

त्यांच्यामधले एक, दिसले जरी साधे
शेपटीवरती पीस लावून, सर्वांपुढे चाले.

मराठी - मानसी महाजन



A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam
12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

बगळा आणि कोल्हा


एक होता कोल्हा. त्याच्या घशात हाडाचा तुकडा अडकला. त्याला खूप दुखत होते, पण अडकलेला तुकडा काढायला कोणाची मदत मिळेना. कोल्हा तसाच विव्हळत जंगलात फिरत होता.




शेवटी त्याला एक बगळा भेटला. "बगळे दादा! माझ्या घशात हाड अडकले आहे. कृपया ते काढ, तुझे खूप उपकार होतील. मी तुला एक भेट सुद्धा देईन." कोल्हा विव्हळला.

"बरे, प्रयत्न करतो." बगळा म्हणाला.

कोल्ह्याने आ वासला.





बगळ्याने त्याची लांब चोच कोल्ह्याच्या घशात घातली आणि हाड बाहेर काढले.

"माझी भेट कुठे आहे?" त्याने विचारले.

कोल्हा हसू लागला. "कोल्ह्याच्या घशात डोके घालूनही तू अजून जिवंत आहेस. हीच खूप मोठी भेट आहे! त्यावर खुश राहा!" कोल्हा हसून म्हणाला.

झाड आणि वेळू


एक खूप मोठा वृक्ष होता.
त्याशेजारी एक वेळू होता.

हलका वारा आला तरी वेळू
हलू लागे, वाऱ्यावर झुलू
लागे. वृक्ष याबद्दल त्याला
चिडवत असे.

वेळू मात्र काही बोलत नसे.

एक दिवस खूप मोठे वादळ आले. वेळू पुढे
वाकला, मागे वाकला, वारा येईल तसा वाकला
पण वादळात तग धरून राहिले.

वृक्ष वाकू शकत नव्हता. वाऱ्याच्या जोरामुळे तो
तुटून पडला.





मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories

Published by

Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

हावरट उंदीर



घराच्या दाराला एक छोटे भोक पडले होते.

त्यातून एक उंदीर आत आला. घरात त्याला भरपूर खायला प्यायला दिसले.

उंदीर खुश झाला. तडस लागेपर्यंत त्याने खा खा खाल्ले. खाऊन झाल्यावर तो भोकातून बाहेर जायचा प्रयत्न करू लागला.

पण खाऊन खाऊन फुगलेल्या पोटामुळे तो आता भोकात मावेना. बाहेर जाऊ शकेना.



वाचू शकणारे गाढव


ताताचारी हा रामलिंगाडूचा शेजारी होता.

तो सारखा काही ना काही कुरापती करत असे. रामलिंगाडूचे आणि ताताचारीचे अजिबात पटत नसे.

एक दिवस ताताचारीने रामलिंगाडूला पत्र लिहिताना पाहिले. रामलिंगाडू पत्रात काय लिहित असेल हे जाणून घ्यायची त्याला उत्सुकता वाटली.


तो हळूच रामलिंगाडूच्या मागे जाऊन उभा राहिला आणि मान लांब करून पत्र वाचायचा प्रयत्न करू लागला.

रामलिंगाडूला त्याची चाहूल लागली.



रामलिंगाडूने मुद्दाम लिहिले: "माझ्या मागे एक गाढव आहे. इतरांची पत्रे वाचण्याची त्याला खोड आहे. मला पत्रात अनेक गोष्टी लिहायच्या आहेत, पण त्या गोष्टी गाढवाला माहित होणे बरे नाही. त्यामुळे मी त्या लिहीत नाही." असे म्हणून त्याने पत्र संपवले.

ताताचारीने हे सगळे वाचले. तो रागाने धुमसत होता, पण करेल काय? त्याने शांतपणे तिथून पोबारा केला.



चला करा!




लंगडी घाला
उड्या मारा
भरा भरा भरा




थोडे धावा
थोडे बागडा
गुडघे हातात धरा




थोडे वाका
अंग ताणा
मान गोल फिरवा




जांभई देऊन
डोळे मिटा
गाढ तुम्ही झोपा.

मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

शेपट्यांच्या समस्या

एक होता उंदीर. त्याला चार शेपट्या होत्या.
त्याला त्याच्या शेपट्या फार आवडत, पण इतर उंदीर त्याला चिडवत.
"चार शेपट्यांचा उंदीर! चार शेपट्यांचा उंदीर!"





त्याने शेवटी एका म्हाताऱ्या उंदराला आपली एक शेपटी कापून टाकायला सांगितली. "जरूर!", म्हातारा उंदीर म्हणाला आणि त्याने उंदराची एक कापून टाकली. आता चार शेपट्यांच्या उंदराला तीनच शेपट्या उरल्या.



आता इतर उंदीर त्याला चिडवू लागले, "तीन शेपट्यांचा उंदीर, तीन शेपट्यांचा उंदीर!"

तो पुन्हा त्या म्हाताऱ्या उंदराकडे गेला आणि आपल्या तीन शेपट्यांपैकी एक शेपटी कापून घेतली.





आता त्याला दोन शेपट्या उरल्या. तरीही इतर उंदीर चिडवायचे बंद नाही झाले. "दोन शेपट्यांचा उंदीर! दोन शेपट्यांचा उंदीर!"




उंदराने आपली अजून एक शेपटी कापून घेतली. तरीही इतर उंदीर त्याला चिडवणे थांबवेनात.



"एका शेपटीचा उंदीर! एका शेपटीचा उंदीर!"

त्यांचे चिडवणे सहन न होऊन, उंदराने आपली शेवटची शेपटी सुद्धा कापून घेतली.
त्याला वाटले - आता तरी इतर उंदीर चिडवायचे थांबतील!
पण आता ते चिडवू लागले "बिन शेपटीचा उंदीर! बिन शेपटीचा उंदीर!"




मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

बाबा...वाघ आला!


एका गावात एक मुलगा राहत असे. तो रोज आपल्या मेंढ्या जंगलात चरायला नेत असे.




एक दिवस त्याला सगळ्यांची फजिती करण्याची हुक्की आली. "बाबा...वाघ! वाघ आला वाघ!" तो ओरडू लागला.

त्याचे वडील आणि बाकी अनेक लोक कामे सोडून धावत आले. "कुठे आहे वाघ?" त्याच्या वडिलांनी विचारले.

मुलगा हसू लागला. "वाघ बीघ काही नाही बाबा! मी तुमची गम्मत केली!"






थोड्या दिवसांनी त्याने पुन्हा तसेच केले. "बाबा...वाघ आला! तो मेंढ्या खात आहे!" तो ओरडला. पुन्हा अनेक माणसे धावत आली.

"मी तर गम्मत करत होतो," मुलगा म्हणाला. मुलाला रागावून, समज देऊन सगळे आपापल्या कामाला परतले.

एक दिवस खरेच वाघ आला! "बाबा...वाघ आला! लवकर या!" मुलगा घाबरून ओरडू लागला.

"त्याच्याकडे अजिबात लक्ष देऊ नका. तो नुसत्या खोड्या करतो." लोक म्हणाले. कोणीही त्याच्या हाकेला धावून आले नाही.

वाघ त्याची मेंढी घेऊन जंगलात पळून गेला.



मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

कोंबडी आणि सुई

खूप पूर्वी कोंबडी आणि गरुड मित्र होते. ते दोघे नेहेमी सोबत राहत.

एकदा गरुडाला दूर त्याच्या घरी जावे लागले. जाताना त्याने कोंबडीला एक सुई दिली.

"ही सुई तुझ्या जवळ ठेव. मी परत आलो की तुझ्याकडून घेईन." गरुड म्हणाला.





कोंबडीने सुई आपल्या पिसांमध्ये जपून ठेवली, परंतु अन्न शोधत असताना सुई कुठेतरी पडली. खूप शोधली तरी कोंबडीला सुई सापडली नाही.

गरुड परत आला. त्याने सुईबद्दल कोंबडीला विचारले. "सुई पडून गेली", कोंबडी उदासपणे म्हणाली.

गरुड चिडला. त्याने ताबडतोब कोंबडीला सुई शोधायला सांगितले. "तू सुई शोधून आणत नाहीस तोपर्यंत मी तुझ्या पिल्लांना खाणार!", गरुडाने धमकी दिली.



तेव्हांपासून कोंबडी आणि गरुड एकमेकांचे शत्रू झाले. गरुड सतत कोंबडीच्या पिल्लांना उचलून नेऊ पाहत असतो, आणि कोंबडी त्याला पळवून लावत असते.



कोंबडीने सुई शोधण्यासाठी आपल्या नातेवाईकांची मदत घेतली. चोचीने, नखांने अजूनही कोंबड्या सुई शोधत फिरत असतात.

काय वाजे काय वाजे?

गड गड गड गड ढम ढम ढम ढम काय वाजे काय वाजे?
ढगात लपल्या म्हातारीचे जाते चाले जाते चाले.

टप टप टप टप धो धो धो धो काय वाजे काय वाजे?
रागे भरले आई बाबा ढगोबा मग रडू लागे.

सर सर सर सर सुईं सुईं सुईं सुईं काय वाजे काय वाजे?
आकाशातील प्रचंड पक्षी वेगे वेगे उडू लागे.

झुळ झुळ झुळ झुळ झुळ झुळ झुळ झुळ काय वाजे काय वाजे?
होड्या सोडा माझ्यामध्ये असे झऱ्याची शीळ सांगे.




मराठी –
मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam
12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions


कंजूस

एक कंजूस माणूस होता. त्याने त्याच्याजवळचे सगळे सोने एका पेटाऱ्यात ठेवले आणि पेटारा मातीत पुरून लपवून ठेवला. रोज कोणी बघत नाही असे पाहून तो पेटारा उकरून काढे, आणि आपल्या खजिन्याकडे टक लावून पाहत बसे. खजिना पाहून त्याला खूप आनंद होत असे.

एका माणसाने त्याला असे करताना पहिले.



त्या माणसाने रात्रीतून
पेटारा चोरला.
दुसऱ्या दिवशी कंजूस
माणूस आला आणि बघतो
तर पेटारा गायब!



सोने चोरीला गेले म्हणून तो रडू लागला. "चोरी गेलेल्या सोन्याबद्दल रडतोस कशाला? तसेही तू त्या सोन्याचा काही उपयोग करत नव्हतास. नुसत्या खड्ड्याकडे पहा आणि खुश राहा! सोने काय आणि माती काय, तुझ्यासाठी सारखेच आहे!" त्याचा शेजारी म्हणाला.




खीर

एका श्रीमंत व्यापाऱ्याने मेजवानी ठेवली. मुल्ला नासिरुद्दीनला सुद्धा आमंत्रण होते. मेजवानीमध्ये सर्वांना वाट्यांमधून खीर देण्यात आली. खीर खायला सर्वांना अगदी छोटे चमचे दिले होते. फक्त व्यापाऱ्यासाठी मोठा चमचा होता.

प्रत्येक घास घेताना व्यापारी जिभल्या चाटत म्हणे, "वाह वाह! इतक्या चविष्ट खिरीवर तर कोणीही जीव ओवाळून टाकेल!"

लहान चमच्यांमुळे इतरांना खिरीची धड चवसुद्धा घेता येत नव्हती.

मुल्ला वैतागला. "साहेब, जरा मोठा चमचा देता का? आम्हालाही खिरीवर आमचा जीव ओवाळून टाकायचा आहे!" तो म्हणाला.



A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam
मराठी - मानसी महाजन
12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions